जनसंपर्क कक्ष
09 APR 2026 जनप्रवास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या १५३ केंद्रांवर विविध परिक्षा सुरळीत

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. १ एप्रिल पासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. मंगळवारी विविध २० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १५३ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. सदर परीक्षांसाठी ३४३७१ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेत कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यात गैरप्रकाराची ३५ प्रकरणांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली असल्याची माहिती कळवण्यात आलीय.

**७ एप्रिल रोजी गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद : कोल्हापूर : ५, सांगली : २५, सातारा -५**

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. ७ एप्रिल रोजी सदर पथकाकडून कोल्हापूर – ५, सांगली- २५ आणि सातारा -५ अशा एकूण ३५ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

09 APR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.-9175089609

# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे दिपक काशीद अध्यक्ष; राकेश डोंगरे उपाध्यक्ष

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्षपदी दिपक नारायण काशीद यांची, तर उपाध्यक्षपदी राकेश आण्णासो डोंगरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक अधिकारी निलेश दिनकर पाटील (सहकारी अधिकारी श्रेणी- २ अधिन, उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर) यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. या बैठकीला संचालक विजय पाटील, राजेंद्र चव्हाण, साताप्पा साळोखे, अनिल साळोखे, सचिन नाळे, विजय इंगवले, शशिकांत साळुंखे, सागर चौरे, विनय पाटील, सागर लांडे, सुरेश पाटील, शितल सरनाईक, वंदना गुरव, चिटणीस नितीन लोहार व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.



दिपक काशीद



राकेश डोंगरे

0 9 APR 2026

जनप्रवास





# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी काशिद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी दिपक काशिद यांची, तर उपाध्यक्षपदी राकेश डोंगरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

0 9 APR 2026

नाईट वॉच

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

कोल्हापूर : असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.


हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०२५-२६ पार पडली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

या संघात अभय विजय हावळ, मुनाफ रियाज अहमद खान, सूरज महादेव कांबळे, स्नेहल सत्येंद्रकुमार चव्हाण, किरण सूर्यकांत भाकरे, तनुजा रावसाहेब कांबळे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, सुधांशू गौतम तांबे, विपश्यना भिकाजी कामत आणि निहाल अलनिसार रुकडीकर यांचा समावेश होता. संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले. संघव्यवस्थापक म्हणून चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले आहे.

09 APR 2026

नाईट वॉच



# शिवाजी विद्यापीठाच्या महिलांची लक्षवेधक कामगिरी

सांगली : भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग (पुरुष व महिला) स्पर्धेत आज दुसऱ्या दिवसअखेर स्पर्धेत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने वर्चस्व प्राप्त केले.

त्याखालोखाल मोहालीचे चंदीगड विद्यापीठ आणि चंदीगडचे पंजाब विद्यापीठ यांच्या क्रीडापटूंनीही लक्षवेधी कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या महिलांनी के-१ (१००० मीटर), सी-१ (१००० मी.) आणि के-४ (१००० मी.) या स्पर्धांत चतुर्थ स्थान पटकावले.

येथील कृष्णा बोट क्लबमध्ये आज झालेल्या स्पर्धांत गुरू नानक देव विद्यापीठाने पुरुष गटातील के-२, सी-२ व के-४ आणि महिला गटातील के-१ व के-२मध्ये अव्वल कामगिरी केली.

चंदीगड विद्यापीठानेही पुरुष व महिला गटातील के-२ व के-४ प्रकारात उत्तम कामगिरी नोंदवली. पंजाब विद्यापीठाने महिला गटातील सी-१ आणि सी-२ स्पर्धांत प्रथम क्रमांक मिळवला. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने पुरुष गटातील सी-१ मध्ये अव्वल येत उपस्थितांची वाहवा मिळवली.

0 9 APR 2026

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग स्पर्धेत गुरु नानक देव विद्यापीठास विजेतपद

## चंदीगड विद्यापीठ उपविजेते; शिवाजी विद्यापीठास अखेरच्या दिवशी दोन पदके



। ललकार वृत्त ।

सांगली, दि.८ (प्रतिनिधी) - शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) यांच्या संयुक्त विद्यमाने येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने विजेतपदावर आपले नाव कोरले. स्पर्धेत चुरशीची लढत देणाऱ्या मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने उपविजेतपद मिळविले आणि चंदीगडच्या पंजाब विद्यापीठास तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले. त्यांनी अनुक्रमे एकूण १८ व १५ पदके प्राप्त केली. सांगली येथील रॉयल कृष्णा बोट क्लब येथे आज या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ खासदार विशाल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाला.

दरम्यान, गेले चार दिवस विविध गटांत चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी आज अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत आपला खेळ उंचावत दोन पदके प्राप्त केली. पुरुषांच्या कयाकिंगमध्ये के-४ गटात रौप्य आणि महिलांच्या कॅनॉईंगमध्ये सी-२ गटात कांस्य पदक पटकावले. महिलांच्या के-४ गटातही चौथे स्थान प्राप्त केले.

अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने स्पर्धेच्या सुरवातीपासून सर्वच गटांत आपले वर्चस्व कायम राखले. स्पर्धेत सातत्यपूर्ण आणि सर्वांगीण कामगिरीच्या जोरावर एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य अशी एकूण १९ पदकांची कमाई करत त्यांनी अजिंक्यपद पटकावले. मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने ६ सुवर्ण, ६ रौप्य व ६ कांस्य अशी एकूण १८ पदके प्राप्त करीत उपविजेतपद मिळविले. चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाने ७ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशा एकूण १५ पदकांसह तृतीय स्थान पटकावले.

स्पर्धेत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने २ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य अशी ८ पदके प्राप्त करीत चौथे, पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १ सुवर्ण ४ रौप्य व १ कांस्य अशी ६ पदके मिळवित पाचवे स्थान प्राप्त केले. गुरू काशी विद्यापीठ, केरळ विद्यापीठ यांनी प्रत्येकी ४, पुण्याचे भारती अभिमत विद्यापीठ, मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी प्रत्येकी ३ पदके प्राप्त केली.

या प्रसंगी स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, पुण्याच्या युवक सेना संचालनालयाचे उपसंचालक सुहास पाटील, सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य धैर्यशील यादव, संजय परमणे, काव्याश्री नलवडे, श्वेता परुळेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, कास्ट्राईबचे आनंद खामकर, पंच प्रतिनिधी मुकेश शर्मा, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. किरण पाटील, डॉ. मयूर सिंहासने, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. राहुल मगदूम, विजय रोकडे, संजय पाटील, डॉ. श्रीदेवी पवार, दत्ता पाटील, डॉ. एन.आर. कांबळे, डॉ. धनंजय पाटील आदी उपस्थित होते. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिसभा सदस्य विशाल गायकवाड यांनी आभार मानले.

0 9 APR 2026

पुढारी वॉच

# शिवाजी विद्यापीठात १० एप्रिलपासून फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

## विशेष व्याख्यानांसह 'सलाम संविधान' कार्यक्रमाचे आयोजन

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ एप्रिल या कालावधीत फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. १०) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत सप्ताहाचे उद्घाटन होईल. यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ११) सकाळी १०.३० वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सभागृहात प्राचार्य जी. पी. माळी यांचे 'महात्मा जोतीराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' या विषयावर व्याख्यान होईल. रविवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता () या युट्यूब वाहिनीवर प्रा. रमेश जाधव यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य' या विषयावर व्याख्यान होईल. सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता राजर्षि शाहू सभागृहात डॉ. प्रकाश कांबळे लिखित 'वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून या परिसंवादात डॉ. प्रवीण जाधव व डॉ. गिरीश मोरे सहभागी होतील. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभाग व शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक कबीर नाईकनवरे यांचा 'सलाम संविधान' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मंगळवारी (दि. १४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा मुख्य कार्यक्रम होणार असून सकाळी ८ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक व पूजन आणि त्यानंतर सकाळी १० वाजता डॉ. प्रशांत बनसोडे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्य' या विषयावर व्याख्यान होईल. या सर्व कार्यक्रमांचा नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा.

0 9 APR 2026

तरुण भारत

# शिक्षणशास्त्र अधिविभागात पुस्तक परीक्षण उपक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागाते पुस्तक परीक्षण उपक्रमाचे संपन्न झाला. आजच्या सामाज माध्यमाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनात रुची निर्माण करण्यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन होते. या अंतर्गत मराठी, हिंदी व इंग्रजी अशा विविध भाषांमधील, विविध साहित्य प्रकारचे समालोचन विद्यार्थ्यांना करावयास सांगितले. प्रसिद्ध साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीलाल शुक्ल लिखित 'राग दरबारी" व लेखक आनंद यादव लिखित 'झोंबी" या पुस्तकांचे परीक्षण करण्यात आले. अनुताई सूरकर व अमृत मगदूम यांनी पुस्तकांचे परीक्षण केले. याप्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. दत्तात्रय भोसले, डॉ. अर्चना कांबळे जगतकर यांनी मत व्यक्त केले.

09 APR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# विद्यार्थ्यांनी ग्रंथांना गुरू करावे: वासुदेव कुलकर्णी

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

जीवनात वाचनासारखा अन्य मोठा आनंद नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचते व्हावे, ग्रंथांना गुरू करावे, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व संपादक वासुदेव कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात आयोजित व्याख्यान आणि विशेष सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कृष्णात दिवटे प्रमुख उपस्थित होते.

श्री. कुलकर्णी म्हणाले की, आजच्या काळामध्ये माणुसकी शिकविणारे शिक्षण घ्यायला हवे. त्याची नितांत गरज आहे. त्यासाठी माणसाने सतत शिकत रहावे. शिकण्याची जिद्द मनात ठेवून विद्यार्थ्यांनी ग्रंथांना गुरू केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपल्या मातीशी जोडून राहिले पाहिजे. आपल्या भाषेचा अभिमान बाळगून वाचनसंस्कृती टिकविण्याचे काम आपणच केले पाहिजे.

या कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या पुस्तकांना महाराष्ट्रातील नामांकित साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त झाले. त्याबद्दल त्यांचा श्री. कुलकर्णी यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, भाग्यश्री प्रकाशनाच्या संचालिका भाग्यश्री कासोटे-पाटील यांचा प्रकाशन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सत्कार



करण्यात आला.

यावेळी डॉ. आलोक जत्राटकर म्हणाले, आजच्या काळातील प्रश्नांना विद्यार्थ्यांनी स्वच्छ हेतूने आणि निर्भयतेने भिडले पाहिजे. सभोवतालच्या विविध गोष्टींचे सूक्ष्म आकलन करून त्याविषयी आपण लिहीते राहिले पाहिजे. सतत वाचन, मनन, चिंतन केले पाहिजे.

भाग्यश्री कासोटे-पाटील यांनी आपल्या प्रकाशन वाटचालीमधील अनुभव कथन केले आणि विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या नव्या वाटा शोधून वाटचाल केली पाहिजे, असे सूचित केले. कृष्णात दिवटे यांनी आपल्या मनोगतामधून वाचन संस्कृती चळवळीविषयी अनुभवकथन करताना आजच्या काळात वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी मराठी अधिविभागातील एम.ए.भाग एकमधील मृण्मयी पांचाल, विमल मोरे, संशोधक विद्यार्थिनी गौरी कुंभार यांचा विशेष प्राविण्याबद्दल सत्कार करण्यात आला.

अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ज्योती वराळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

09 APR 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिक्षणशास्त्र अधिविभागामध्ये पुस्तक परीक्षण उपक्रम संपन्न




**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**
शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथे पुस्तक परीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या सामाज माध्यमाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनात रुची निर्माण करण्यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन अधिविभागात केले जाते.त्यांतर्गत मराठी ,हिंदी व इंग्रजी अशा विविध भाषांमधील,विविध साहित्य प्रकारचे समालोचन विद्यार्थ्यांना करावयास सांगितले जाते.त्याअंतर्गत अधिविभागात दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीलाल शुक्ल लिखित राग दरबारी व लेखक आनंद यादव लिखित झोंबी या पुस्तकांचे परीक्षण करण्यात आले. बी.एड .एम.एड (एकात्मिक) प्रशिक्षणार्थी अनुताई सूरकर व अमृत मगदूम यांनी पुस्तकांचे परीक्षण केले.

याप्रसंगी राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय कोल्हापूरचे प्राचार्य प्रा.डॉ.दत्तात्रय भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सूचना केल्या तर द न्यू कॉलेज शिवाजी पेठ, कोल्हापूर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.अर्चना कांबळे जगतकर यांनी 'पुस्तक परीक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या भाव भावनांशी नाते निर्माण करता आले पाहिजे'असे मत व्यक्त केले. यावेळी अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ.चेतना प्र.सोनकांबळे या होत्या. पुस्तक परीक्षणाची पार्श्वभूमी डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर पडवी यांनी केले तर आभार संजना भालकर यांनी मानले. अधिविभागातील प्राध्यापक,शिक्षक व संशोधक विद्यार्थी ,एम एड, बी.एड .एम.एड (एकात्मिक) ,बी एस्सी .बी एड (ITEP) प्रशिक्षणार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनप्रवास


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'परिस स्पर्श'मधून हलकर्णी महाविद्यालयाचा आदर्श उपक्रम

## मार्गदर्शक संस्थेची भूमिका निभावून गुणवत्ता वृद्धी : परिसरातील महाविद्यालयांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविली प्रभावी योजना

**जनप्रवास : हलकर्णी**

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांचा दर्जा उंचावण्यासाठी व सर्व महाविद्यालयांना 'नॅक' मानांकन मिळावे या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेली 'परिस स्पर्श' ही महत्वाकांक्षी योजना आता प्रभावीपणे आकार घेत असून, या योजनेत हलकर्णी महाविद्यालयाने मार्गदर्शक संस्थेची भूमिका निभावत गुणवत्ता वृद्धीचे आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. यामध्ये 'नॅक ए' मानांकन प्राप्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची मेंटर संस्थे म्हणून निवड केली असून, हलकर्णी महाविद्यालयाने मेंटी महाविद्यालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली.

या उपक्रमांतर्गत आजरा, महागाव, कार्वे, गडहिंग्लज व गिजवणे येथील विविध महाविद्यालयांशी सामंजस्य करार करून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एकत्रित प्रयत्न सुरू केले. 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढ आणि शाश्वतता' या विषयावरील पहिली एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन दौलत विश्वस्त संस्थेचे ज्येष्ठ संचालक गोपाळराव पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य स्वागत परुळेकर, नॅक समन्वयक प्रा. डॉ. सागर डेळेकर तसेच विद्यार्थी विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यानंतर आयोजित कार्यशाळांमधून 'परिणाम मूल्यांकन व व्यापक प्रभाव', 'संशोधन, नवोन्मेष आणि उद्योजकता परिसंस्था' यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. द न्यू कॉलेज, कोल्हापूरचे आयक्यूएसी समन्वयक डॉ. नीलेश पवार, तसेच शिवाजी विद्यापीठाचे डॉ. एच. एम. यादव व डॉ. पी. ए. कोयले यांनी संशोधनविषयक दृष्टिकोन स्पष्ट केला. याशिवाय मेंटी महाविद्यालयांच्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करून 'नॅक' मूल्यांकन प्रक्रियेसाठी आवश्यक तयारी, अकॅडमिक व प्रशासकीय लेखापरीक्षण (AAA), प्रभावी सादरीकरण आणि आवश्यक दस्तऐवजीकरण याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. सागर डेळेकर व अभिजित रेडेकर यांनी या प्रशिक्षणात महत्त्वपूर्ण योगदान दिले. महागाव येथील संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजीनियरिंगमध्ये 'शिक्षणातील गुणवत्ता वाढ' वर कार्यशाळा घेतली. मुंबई येथील प्रा. डॉ. प्रविण यादव व प्राचार्य डॉ. संजय सावंत यांनी मार्गदर्शन केले. तसेच आजरा येथे 'नॅक मूल्यांकनातील बदल' या विषयावर झालेल्या कार्यशाळेत प्रा. डॉ. सागर डेळेकर व प्रा. डॉ. सचिन पवार यांनी अद्ययावत माहिती दिली.

या सर्व उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी प्राचार्य प्रा. डॉ. बी. डी. अजळकर यांच्या नेतृत्वाखाली केली. परिस स्पर्श योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. राजेश घोरपडे, प्रा. डॉ. ज्योती व्हटकर, प्रा. पी. ए. पाटील यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने सक्रिय सहभाग घेतला. दौलत विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष अशोकराव जाधव, उपाध्यक्ष संजय पाटील, सचिव विशाल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विविध मेंटी महाविद्यालयांच्या प्राचार्य व नॅक समन्वयकांनीही सहकार्य केले. 'परिस स्पर्श' योजनेच्या माध्यमातून हलकर्णी महाविद्यालयाने केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर गुणवत्ता विकासासाठी प्रत्यक्ष कृती आराखडा राबवून उच्च शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला असून, यामुळे संबंधित महाविद्यालयांच्या 'नॅक' मानांकन प्रक्रियेला निश्चितच गती मिळणार आहे.

12:47 PM IMG-20260409-WA0021.jpg

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 APR 2026

# उद्यापासून शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ एप्रिल या कालावधीत फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. १०) सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत सप्ताहाचे उदघाटन होईल. यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ११) सकाळी १०:३० वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या सभागृहात प्राचार्य जी. पी. माळी यांचे 'महात्मा जोतीराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' या विषयावर व्याख्यान होईल. रविवारी (दि. १२) सकाळी १०:३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता (@ShivVarta) या युट्यूब वाहिनीवर प्रा. रमेश जाधव यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य' या विषयावर व्याख्यान होईल. सोमवारी (दि. १३) सकाळी १०:३० वाजता राजर्षि शाहू सभागृहात डॉ. प्रकाश कांबळे लिखित 'वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून या परिसंवादात डॉ. प्रवीण जाधव व डॉ. गिरीश मोरे सहभागी होतील. त्याच दिवशी सायंकाळी ५:३० वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभाग व शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक कबीर नाईकनवरे यांचा 'सलाम संविधान' हा कार्यक्रम होईल.

0 9 APR 2026

# उद्यापासून शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताह

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ एप्रिल या कालावधीत फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. १०) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत सप्ताहाचे उद्घाटन होईल. यावेळी प्रा. सुकुमार कांबळे यांचे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन" या विषयावर व्याख्यान होईल. महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ११) सकाळी १०.३० वाजता डॉ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या सभागृहात प्राचार्य जी. पी. माळी यांचे 'महात्मा जोतीराव फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' या विषयावर व्याख्यान होईल.

रविवारी (दि. १२) सकाळी १०.३० वाजता शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता (@ShivVarta) या युट्यूब वाहिनीवर प्रा. रमेश जाधव यांचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समतामूलक समाज निर्मितीचे कार्य' या विषयावर व्याख्यान होईल. सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात डॉ. प्रकाश कांबळे लिखित 'वर्तमान उपयुक्त अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून या परिसंवादात डॉ. प्रवीण जाधव व डॉ. गिरीश मोरे सहभागी होतील. त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये विद्यार्थी विकास विभाग व शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक कबीर नाईकनवरे यांचा 'सलाम संविधान' हा कार्यक्रम होईल.

6, 12:48 PM
IMG-20260409-WA0018.jpg
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 APR 2026

पुढारी

# गुरू नानक देव विद्यापीठास विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठास अखेरच्या दिवशी दोन पदके

सांगली : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) यांच्या संयुक्त विद्यमाने येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने उपविजेतेपद मिळविले, तर चंदीगडच्या पंजाब विद्यापीठास तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्यांनी अनुक्रमे एकूण १८ व १५ पदके प्राप्त केली.

सांगली येथील रॉयल कृष्णा बोट क्लब येथे बुधवारी या स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. गेले चार दिवस विविध गटांत चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी बुधवारी अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत आपला खेळ उंचावत दोन पदके प्राप्त केली. पुरुषांच्या कयाकिंगमध्ये के-४ गटात रौप्य आणि महिलांच्या कॅनॉईंगमध्ये सी-२ गटात कांस्यपदक पटकावले. महिलांच्या के-४ गटातही चौथे स्थान प्राप्त केले.

अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने स्पर्धेच्या सुरुवातीपासून सर्वच गटांत वर्चस्व कायम राखले. सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य, अशी एकूण १९ पदकांची कमाई करत त्यांनी अजिंक्यपद पटकावले.

पारितोषिक वितरणप्रसंगी स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, मावळते जिल्हाधिकारी अशोक काकडे, पुण्याच्या युवक सेना संचालनालयाचे उपसंचालक सुहास पाटील, सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, डॉ. रामचंद्र पवार, सिद्धा[...] शिंदे, धैर्यशील यादव, संजय परमणे[...] काव्याश्री नलवडे, श्वेता परुळेकर, डॉ[...] राजाराम गुरव, आनंद खामक[र] उपस्थित होते. डॉ. शरद बनसोडे यां[नी] स्वागत केले. अधिसभा सदस्य विशा[ल] गायकवाड यांनी आभार मानले. चित[ळे] उद्योग समूहाच्या वतीने सहभा[गी] क्रीडापटूंना भेटवस्तू देण्यात आल्या.






सांगली : अंतिम फेरीतील निर्णायक क्षण. दुसऱ्या छायाचित्रात विजेत्या गुरू नानक देव विद्यापीठ संघास चषक देऊन गौरविण्यात आले. (छाया : सचिन सुतार)

आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 9 APR 2026 पुढारी

# गुरू नानक देव विद्यापीठास विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठास अखेरच्या दिवशी दोन पदके


सांगली : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) यांच्या संयुक्त विद्यमाने येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने उपविजेतेपद मिळविले, तर चंदीगडच्या पंजाब विद्यापीठास तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्यांनी अनुक्रमे एकूण १८ व १५ पदके प्राप्त केली.

सांगली येथील रॉयल कृष्णा बोट क्लब येथे बुधवारी या स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. गेले चार दिवस विविध गटांत चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी बुधवारी अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत आपला खेळ उंचावत दोन पदके प्राप्त केली. पुरुषांच्या कयाकिंगमध्ये के-४ गटात रौप्य आणि महिलांच्या कॅनॉईंगमध्ये सी-२ गटात कांस्यपदक पटकावले. महिलांच्या के-४ गटातही चौथे स्थान प्राप्त केले.

अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने स्पर्धेच्या सुरुवातीपासून सर्वच गटांत वर्चस्व कायम राखले. सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य, अशी एकूण १९ पदकांची कमाई करत त्यांनी अजिंक्यपद पटकावले.

पारितोषिक वितरणप्रसंगी स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, मावळते जिल्हाधिकारी अशोक काकडे, पुण्याच्या युवक सेना संचालनालयाचे उपसंचालक सुहास पाटील, सांगली जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, डॉ. रामचंद्र पवार, सिद्धार्थ शिंदे, धैर्यशील यादव, संजय परमणे, काव्याश्री नलवडे, श्वेता परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, आनंद खामकर उपस्थित होते. डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. अधिसभा सदस्य विशाल गायकवाड यांनी आभार मानले. चितळे उद्योग समूहाच्या वतीने सहभागी क्रीडापटूंना भेटवस्तू देण्यात आल्या.





सांगली : अंतिम फेरीतील निर्णायक क्षण. दुसऱ्या छायाचित्रात विजेत्या गुरू नानक देव विद्यापीठ संघास चषक देऊन गौरविण्यात आले. (छाया : सचिन सुतार)

**आंतरविद्यापीठ कयाकिंग व कॅनॉईंग स्पर्धा**

0 9 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅनॉइंग-कयाकिंग स्पर्धेत गुरू नानकदेव विद्यापीठ अजिंक्य

## चंडीगड विद्यापीठ उपविजेते : शिवाजी विद्यापीठास अखेरच्या दिवशी दोन पदके

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** सांगलीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनॉइंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरू नानकदेव विद्यापीठाने विजेतेपदावर आपले नाव कोरले. मोहालीच्या चंडीगड विद्यापीठाने उपविजेतेपद मिळविले. चंडीगडच्या पंजाब विद्यापीठास तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले. शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत दोन पदके प्राप्त केली.



सांगलीतील कॅनॉइंग-कयाकिंग स्पर्धेतील विजेतेपदाचा चषक अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाचा संघास खासदार विशाल पाटील यांच्या हस्ते दिला.

अमृतसरच्या गुरू नानक देव विद्यापीठाने स्पर्धेच्या सुरुवातीपासून सर्वच गटांत वर्चस्व राखत एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य पदकासह अजिंक्यपद पटकावले. मोहालीच्या चंडीगड विद्यापीठाने ६ सुवर्ण, ६ रौप्य व ६ कांस्य अशी एकूण १८ पदके प्राप्त करीत उपविजेतेपद मिळविले.

चंडीगडच्या पंजाब विद्यापीठाने ७ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशा एकूण १५ पदकांसह तृतीय स्थान पटकावले. स्पर्धेत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने २ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य अशी ८ पदके प्राप्त करीत चौथे, पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुवर्ण ४ रौप्य व कांस्य अशी ६ पदके मिळवीत पाचवे स्थान प्राप्त केले. गुरू काशी विद्यापीठ, केरळ विद्यापीठ यांनी प्रत्येकी ४, पुण्याचे भारती अभिमत विद्यापीठ, मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ यांनी प्रत्येकी तीन पदके प्राप्त केली

केलीचंडीगडच्या पंजाब विद्यापीठाने ७ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशा एकूण १५ पदकांसह तृतीय स्थान पटकावले. स्पर्धेत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाने २ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य अशी ८ पदके प्राप्त करीत चौथे, पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुवर्ण ४ रौप्य व कांस्य अशी ६ पदके मिळवीत पाचवे स्थान प्राप्त केले. गुरू काशी विद्यापीठ, केरळ विद्यापीठ यांनी प्रत्येकी ४, पुण्याचे भारती अभिमत विद्यापीठ, मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, राजस्थान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ यांनी प्रत्येकी तीन पदके प्राप्त केली

यावेळी स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, कृषी औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, युवक सेवा संचालनालयाचे उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडाधिकारी किरण बोरवडेकर, अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

0 9 APR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुरुनानक देव विद्यापीठ विजेते, चंदीगडला उपविजेतेपद

## शिवाजी विद्यापीठाला अखेरच्या दिवशी दोन पदके; अ. भा. आंतरविद्यापीठ कनोईंग, कयाकिंग स्पर्धेचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय विद्यापीठ महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने सांगलीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धेत एकूण १९ पदके पटकावत अमृतसरच्या गुरुनानक देव विद्यापीठाने विजेतेपद, तर मोहालीच्या चंदीगड विद्यापीठाने उपविजेतेपद मिळवले. चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाला तिसऱ्या स्थानी समाधान मानावे लागले. त्यांनी अनुक्रमे एकूण १८ व १५ पदके प्राप्त केली. येथील रॉयल कृष्णा बोट क्लब येथे स्पर्धेचे पारितोषिक वितरण खासदार विशाल पाटील यांच्या उपस्थितीत झाले.





सांगली : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेतील विजेत्या गुरुनानक देव विद्यापीठ संघाला पारितोषिक देताना खासदार विशाल पाटील, अशोक काकडे, विशाल गायकवाड, दत्ता पाटील, डॉ. शरद बनसोडे, सिद्धार्थ शिंदे आदी. दुसऱ्या छायाचित्रात कनोईंग व कयाकिंग स्पर्धेत तीन संघांमध्ये सुरू असलेली चढाओढ.

गुरुनानक देव विद्यापीठाने प्रारंभापासून सर्वच गटांत वर्चस्व ठेवले. एकूण ११ सुवर्ण, ८ रौप्य अशी एकूण १९ पदकांची कमाई केली. चंदीगड विद्यापीठाने ६ सुवर्ण, ६ रौप्य व ६ ब्राँझ अशी एकूण १८ पदके पटकावली. पंजाब विद्यापीठाने ७ सुवर्ण, २ रौप्य व ६ ब्राँझ अशा एकूण १५ पदकांसह तृतीय स्थान पटकावले.

खासदार विशाल पाटील म्हणाले, 'राज्यात या स्पर्धा प्रथमच भरवण्याचा मान शिवाजी विद्यापीठाला मिळाला. कृष्णा काठावर रंगलेल्या या स्पर्धांमुळे भविष्यात आंतरराष्ट्रीय कनोईंग व कयाकिंग स्पर्धा सांगलीकर घेऊ शकतात, हे सिद्ध झाले आहे. आता कनोईंग व कयाकिंग या जलक्रीडा प्रकाराला राज्यभरात चालना मिळेल.'

मुकेश शर्मा, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. किरण पाटील, डॉ. सिंहासने, आकाश बनसोडे, प्रशांत पाटील, राहुल मगदूम, विजय रोकडे, संजय पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले. दत्ता पाटील, प्रताप जामदार, अमोल बोळाज यांनी संयोजन केले. डॉ. श्रीदेवी पवार, महादेव ठोंबरे यांनी सूत्रसंचालन केले.

राज्य कृषी, औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, स्पर्धा निरीक्षक डॉ. संदीप शिंदे, सुहास पाटील, जिल्हा क्रीडाधिकारी किरण बोरवडेकर, डॉ. रामचंद्र पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य धैर्यशील यादव, संजय परमणे, काव्यश्री नलवडे, श्वेता परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, आनंद खामकर आदी उपस्थित होते. क्रीडा, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागतक केले. अधिसभा सदस्य विशाल गायकवाड यांनी आभार मानले. चितळे उद्योग समूहाच्या वतीने सहभागी क्रीडापटूंना भेटवस्तू दिल्या.

### शिवाजी विद्यापीठ चौथ्या स्थानी

दरम्यान, गेले चार दिवस विविध गटांत चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी आज अखेरच्या दिवशी २०० मीटर शर्यतीत दोन पदके प्राप्त केली. पुरुषांच्या कयाकिंगमध्ये के-४ गटात रौप्य आणि महिलांच्या कनोईंगमध्ये सी-२ गटात ब्राँझ पदक पटकावले. महिलांच्या के-४ गटातही चौथे स्थान प्राप्त केले.